स्थापना सन १९९७

पारिजात

को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : टी.एन.ए.(टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७



विना सहकार नाही उध्दार !

पारिजात
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
नवी मुंबई

९ वा
वार्षिक अहवाल
सन २००५-२००६


विद्यमान संचालक मंडळ



श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष



श्री. दशरथ आ. बडदे
उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव



श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार



श्री. दिपक शं. टेळे
संचालक



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री. शंकर रा. पुली
संचालक



सौ. मंदा ज्ञा. खोपडे
संचालिका



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक



श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्य. अधिकारी



श्री. एस. आर. ताकवले
व्यवस्थापक

पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि.नं. टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस.आर./सी.आर. ९५१/९७

मुख्य कार्यालय : अे/३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

नववी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **नववी सर्वसाधारण सभा रविवार दि. १३ / ८ / २००६ रोजी सकाळी १०.३० वाजता गुरव ज्ञाती भवन, २-सी/३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि. ७/८/२००५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २००६ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २००५-२००६ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.

४) सन २००५-२००६ च्या लेखापरिक्षण अहवालास मंजूरी देणे.

५) सन २००६-२००७ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करून मानधन ठरविणे.

६) सन २००६-२००७ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

७) पोटनियम दुरूस्ती स्विकारून मंजूरी देणे.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : ०६/०७/२००६

संचालक मंडळाच्या वतीने
श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले
(सचिव)

विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही व त्या सभेत वरील नोटिसीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार केला जाईल.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजित सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.

३) सभेस येताना अहवालाची ही प्रत कृपया बरोबर आणावी.

कार्यालयीन वेळ

सोमवार ते शुक्रवार - सकाळी १०.०० ते ०१.३०
- दुपारी ०२.३० ते ०६.००

शनिवार - सकाळी १०.०० ते ०१.३०

९ वा वार्षिक कार्य अहवाल सन २००५-२००६

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २००६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ९ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रू. लाखात)

तपशिल	३१/०३/२००५ रु.	३१/०३/२००६ रु.	वाढ रु.	टक्केवारी
भाग भांडवल	७८.४६	८३.३९	४.९३	६.२८
राखीव व इ. निधी	५८.६५	७२.४१	१३.७६	२३.४६
सभासद ठेवी	८७५.६८	११०२.३८	२२६.७०	२५.८९
गुंतवणूक	२००.९९	३०२.९९	१०२.००	५०.७५
सभासद कर्जे	६९५.०५	८०४.५५	१०९.५०	१५.७५
खेळते भांडवल	१०४९.१०	१२९६.१२	२४७.०२	२३.५५

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पूर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

सभासद :- ४१०७

गतवर्षी संस्थेचे ३९०८ सभासद होते, अहवाल वर्षात ४४७ नवीन सभासद झाले आणि २४८ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ४१०७ सभासद संख्या झाली आहे.

भाग भांडवल :- रु. ८३.३९ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे वसूल भागभांडवल रु. ७८,४६,०००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ४,९२,५००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००६ अखेर संस्थेचे वसूल भागभांडवल रु. ८३,३८,५००/- इतके आहे.

गंगाजळी व इतर निधी :- रु. ७२.४१ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समानिकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, तसेच सेवक ग्रॅज्युईटी निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. ५८,६५,३७८/- होते त्यामध्ये अहवाल साली रु. १३,७५,१४७/- ने वाढ होऊन वर्षाअखेरीस एकूण स्वनिधी रुपये ७२,४०,५२५/- इतका झाला आहे.

ठेवी :- रु. ११०२.३८ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदीपक वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु. ८,७५,६७,६२८/-होत्या. त्यामध्ये रु. २,२६,७०,७४१/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००६ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ११,०२,३८,३६९/- झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण २६% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

ठेवीचा प्रकार	सन २००२-०३	सन २००३-०४	सन २००४-०५	सन २००५-०६
बचत ठेव	७२,७८,१७०.००	९५,१७,४६३.००	९३,०८,३३३.००	१,०५,७२,२०७.००
दैनंदिन बचत ठेव	८६,८१,२३३.००	१,१०,१५,१८४.००	१,३७,७३,९४६.००	२,०९,६८,३०८.००
अल्प मुदत ठेव	३०,२७,८२३.००	६४,७१,५२९.००	७०,१६,२९१.००	९१,९१,४०८.००
मुदत ठेव	६१,३८,०२९.००	८०,५८,३०९.००	९७,८१,३१९.००	१,३२,१२,६६०.००
दामदुप्पट ठेव	९४,४५,२८५.००	१,५३,९७,८२५.००	१,७३,६१,४२३.००	१,८२,८१,४२९.००
पारिजात बक्षिस १९९८	५,५१,५००.००	९,३५,२७५.००	६,६३,७७४.००	१,५०,६७६.००
पारिजात बक्षिस २०००	२६,२८,०००.००	३६,५८,४२२.००	३८,७८,५७४.००	३६,७७,३६४.००
संकल्प सिद्धी ठेव	-	१९,५९,१४५.००	४०,३२,४००.००	३१,५७,९९६.००
सिद्धी ठेव	२६,८६,०००.००	३२,५७,०६१.००	२९,१४,९१८.००	२९,६०,०६१.००
मासिक प्राप्ती ठेव	३१,५७,५००.००	४४,१८,०००.००	५९,५४,६७५.००	९९,०२,७२५.००
आवर्त ठेव	१०,५२,९९१.००	१५,५७,६३७.००	१९,८४,७६२.००	१८,८५,२३४.००
सभासद ठेव	१५,६२,३७१.००	३५,५१,४४४.००	४५,२१,४७१.००	४१,९०,१०८.००
शुभकार्य ठेव	६,४७,३४६.००	२६,२१,४९०.००	६३,७५,७४२.००	१,२०,८८,१९३.००
एकूण रु.	४,६८,५६,२४८.००	७,२४,१८,७८४.००	८,७५,६७,६२८.००	११,०२,३८,३६९.००

गुंतवणूक :- रु. ३०२.९९ लाख

संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. २,००,९८,८५०/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु. १,०२,००,०००/- ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु. ३,०२,९८,८५०/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ५०.७५% एवढे आहे.

गुंतवणूक तपशील	रक्कम रुपये
दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. भाग	१,०००.००
महा.रा.सह.पत.फेड.लि. भाग	३,०००.००
राखीव निधी	२२,३०,८५०.००
संशयित व बुडित कर्ज निधी	१२,६०,०००.००
लाभांश समानिकरण निधी	१,५५,०००.००
सभासद कल्याण निधी	३६,०००.००
सेवक ग्रॅज्युईटी व कल्याण निधी	९९,०००.००
धर्मादाय निधी	५९,०००.००
मुदत ठेव गुंतवणूक	२,६४,५५,०००.००
एकूण रु.	३,०२,९८,८५०.००

कर्जे :- रु. ८०४.५५ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करून सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु. ६,९५,०५,४२१/- कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु. ७,६४,६२,८१०/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. ६,५५,१३,४७६/- कर्ज वसूल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. ८,०४,५४,७५५/- कर्ज येणे बाकी आहे. वर्षअखेर कर्ज व ठेवीचे गुणोत्तर प्रमाण (C.D. Ratio) ६३% असून महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याच्या निकषांनुसार तो सुसंगत आहे.

सुधारीत कर्ज नियमावली :-

सभासदांच्या गरजांचा विचार करुन त्यांना प्रचलित कर्ज सुविधा अधिक चांगल्याप्रकारे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संस्थेने अहवाल वर्षात सुधारित कर्ज नियमावली तयार केलेली आहे. यामध्ये मुख्यतः मध्यम वर्गीय नोकरदार, छोटे मोठे व्यापारी, व्यावसाईक यांची निकड ओळखून सुधारणा केल्या आहेत.

अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थांना सुद्धा एन.पी.ए. निकष लागू केले व अनुत्पादक कर्जांची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि.३१ मार्च २००६ अखेर निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ४.८८% आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीएचे प्रमाण हे १५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जांची संस्थेने १००% तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २००६ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रू. लाखात)

अ.क्र.	कर्जाचे वर्गीकरण	येणे कर्ज रक्कम	आवश्यक तरतूद	प्रत्यक्ष तरतूद
१.	उत्पादित जिंदगी	७५७.५६	---	---
२.	अनुत्पादीत जिंदगी			
	अ) सर्वसधारण जिंदगी	३३.५९	१.६८	१.६८
	ब) संशयीत जिंदगी	१३.४०	६.४५	६.४५
	क) बुडीत जिंदगी	---	---	---
	एकूण	८०४.५५	८.१३	८.१३

खेळते भांडवल :- रु. १,२९६.१२ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. १,०४९.१० लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल २३.५५% प्रमाणे रु. १७०.८५ लाखाने वाढून रु. १२९६.१२ लाख इतके झाले आहे.

नफा विभागणी :- रू. ११.६६ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतूदी वजा जाता रू. ११,६६,२४४.५० नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रू.७५.७४/- मिळुन नफा रू.११,६६,३२०.२४ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

तपशील	रक्कम रुपये
राखीव निधी (२५% प्रमाणे)	२,९१,५८०.००
लाभांश (५% प्रमाणे)	३,९२,३००.००
इमारत निधी	२,८२,०००.००
बुडित कर्ज निधी	१,००,०००.००
थकीत व्याज तरतूद	५०,०००.००
लाभांश समानिकरण निधी	१०,०००.००
सभासद कल्याण निधी	१०,०००.००
सहकार प्रशिक्षण निधी	२०,०००.००
दशकपुर्ती सोहळा निधी	१०,०००.००
पुढील वर्षासाठी शिल्लक नफा	४४०.२४
एकूण रु.	११,६६,३२०.२४

संचालक मंडळ सभा :-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी मागिल वर्षापासून महिन्यातून दोन सभा घेण्यास सुरवात झाली आहे. त्यानुसार अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण २३ सभा झालेल्या आहेत तसेच यापुर्वी कर्ज मंजुरी समितीच्या महिन्यातून दोन सभा होत असत. कर्ज मागणी करणाऱ्या सभासदास अधिक तत्पर सेवा देण्याच्या हेतुने त्यामध्ये वाढ करून दरमहा ३ सभा घेण्यात आल्या. त्यानुसार अहवाल वर्षात कर्ज मंजुरी समितीच्या एकूण ३५ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर कामकाज नियंत्रण, कर्जवसूली यासाठी सुद्धा सभा आवश्यकते नुसार वेळोवेळी घेतल्या गेल्या.

विद्यार्थी गुणगौरव सोहळा :-

सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांसाठी विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे दिनांक १७ जुलै २००५ रोजी गुरव ज्ञाती भवन, २ सी/३, सेक्टर-९ अे, वाशी डेपोजवळ, नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. समारभांत सन्माननिय सभासदांच्या पाल्यांना प्रशस्तीपत्रक व पारितोषिके देवुन गौरवण्यांत आले.

एस.एस.सी. बोर्डात मुंबई विभागात मुलींमध्ये सर्वप्रथम आलेली कु.प्रियंका मराठे हिला विशेष पाहुणे म्हणुन निमंत्रित करण्यात आले होते. तसेच प्रमुख वक्ते म्हणुन नवी मुंबई नेरूळ येथील डॉटलिंक या संगणक प्रशिक्षण संस्थेचे संचालक श्री. सुभाष अहिरे सर यांना निमंत्रीत करण्यात आले होते.

आमची गुणवान मुलं शैक्षणिक वर्ष २००४-२००५

इयत्ता - दहावी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. सिद्धेश विजय म्हात्रे	८४.००	वाशी
२	कु. दिलीप दामोदर कोळेकर	८२.६६	वाशी
३	कु. प्रियंका कुन्हे	८१.०६	वाशी

इयत्ता - नववी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. शलाका ज्ञानदेव शेवाळे	९३.६०	वाशी
२	कु. जयश्री मधुकर लांजेकर	८८.६२	वाशी
३	कु. रुपाली सखाराम मेंगडे	८५.४५	नेरुळ

इयत्ता - आठवी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. ऋषभ रमेश छेडा	८८.४२	दादर
२	कु. हेमांगी जयसिंग यादव	८४.६२	वाशी
३	कु. पूनम भानुदास चव्हाण	७९.८९	दादर

इयत्ता - सातवी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. प्रियंका बाळासाहेब शिंदे	८८.३३	पुणे
२	कु. पुजा संजय भोसले	८७.८४	नेरुळ
३	कु. तुषार दत्तात्रय पवार	८७.३८	वाशी

इयत्ता - सहावी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. शुभांगी उत्तम दुपडे	८२.७६	नेरुळ
२	कु. योगिता शरद घोडेकर	८२.४६	नेरुळ
३	कु. उन्मेश अनिल गावडे	८१.००	दादर

इयत्ता - पाचवी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. सौरभ दिपक जाधव	९३.७५	वाशी
२	कु. समीरकुमार अशोक शेलार	९०.१६	नेरुळ
३	कु. अजित शिवाजी सुळ	८५.८३	वाशी

इयत्ता - सहावी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. शुभांगी उत्तम दुपडे	८२.७६	नेरुळ
२	कु. योगिता शरद घोडेकर	८२.४६	नेरुळ
३	कु. उन्मेश अनिल गावडे	८१.००	दादर

इयत्ता - पाचवी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. सौरभ दिपक जाधव	९३.७५	वाशी
२	कु. समीरकुमार अशोक शेलार	९०.१६	नेरुळ
३	कु. अजित शिवाजी सुळ	८५.८३	वाशी

इयत्ता - चौथी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. राजश्री सखाराम उनवणे	९५.५०	वाशी
२	कु. अभिषेक शशिकांत तजबिजे	९५.३७	पुणे
३	कु. प्रतिक्षा हनुमान पवळे	९२.५०	वाशी
४	कु. स्नेहा दत्तात्रय बनकर	९२.५०	वाशी

इयत्ता - तिसरी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. ओंकार श्रीराम भालेराव	९५.१४	पुणे
२	कु. दिपाली दिपक टेळे	९३.२५	वाशी
३	कु. वैष्णवी मुरलीधर आल्हाट	८८.८७	पुणे

इयत्ता - दुसरी

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. हर्षदा हनुमंत ढवळे	९७.००	वाशी
२	कु. सुरज कैलास कोंडे	९५.७५	नेरुळ
३	कु. प्रफुल्ल शिवाजी सावंत	९४.५०	वाशी

इयत्ता - पहिली

अ.क्र.	विद्यार्थ्याचे नाव	टक्के	शाखा
१	कु. आरती सखाराम उनवणे	९९.००	वाशी
२	कु. मच्छिंद्र सखाराम उनवणे	९६.५०	वाशी
३	कु. अंकीता अशोक शेलार	९५.७५	नेरुळ

प्रशिक्षण शिबीर :-

सहकार वर्षात संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे यांचे अंतर्गत ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि. यांच्या विद्यमाने पतसंस्थांमधील संचालक व कर्मचारी यांच्यासाठी दि. १८/१२/२००५ रोजी सहकार भवन, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे 'सेवक प्रशिक्षण कार्यक्रमाचे' आयोजन केले होते. या प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन मा.श्री. भाऊसाहेब कुऱ्हाडे (संचालक, ठा.जि.म.सह. बँक लि.) यांचे हस्ते झाले. सदर प्रशिक्षण शिबिरास सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांनी उपस्थित राहून प्रशिक्षण वर्गास मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात रिर्झव्ह बँकेचे निवृत्त उपमहाप्रबंधक श्री. विश्वास नित्सुरे यांनी एन.पी.ए. संकल्पना व व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. पारसिक बँकेचे एस.आर.ओ. श्री. जनार्दन बोटे यांनी कर्जवाटप व कर्जवसुली या विषयावर माहिती दिली. ठाणे सहकारी बोर्डाचे विकास अधिकारी श्री. डी.बी. गुंजाळ यांनी हिशोबलेखन व ताळेबंदाचे विश्लेषण कसे करावे याबाबत बहुमूल्य मार्गदर्शन केले. ॲड. राजेंद्र पालवे यांनी भारतीय करार कायदा व निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्टबाबत माहिती दिली. श्री. ए.एल. जाधव यांनी सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी काही महत्वाच्या सूचना प्रशिक्षण वर्गास दिल्या.

आजच्या स्पर्धात्मक युगात संस्थेच्या सभासद, ठेवीदार, खातेदार यांना तत्पर व कार्यक्षम तसेच ग्राहकाभिमुख सेवा देणे हाच मुख्य उद्देश समोर ठेऊन संस्था अशा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन यापुढेही करणार आहे.

लेखापरिक्षण :-

संस्थेची सन २००५-०६ या आर्थिक वर्षाची शासकीय हिशोब तपासणी श्री. एम. एल.मोहोळकर (सनदी लेखापरिक्षक) यांनी केली असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले असून संस्थेस 'अ' वर्ग प्रदान केला आहे.

संस्थेचे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. रतिकांत आर. पिंगळे (चार्टर्ड अकाऊंटंट) यांनी केली असून संस्थेच्या कामकाजाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

१) हडपसर शाखा उद्घाटन :-

अहवाल वर्षात संस्थेने पुण्यातील सासवड, हडपसर, लोणी विभागातील असंख्य सभासदांच्या विनंतीवरून हडपसर शाखा कार्यान्वीत केली. या शाखेचे उद्घाटन मा. आमदार श्री. जगन्नाथ शेवाळे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर उद्घाटन सोहळ्यास पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. रेवणनाथ दरवटकर, भोर तालुका पंचायत समितीचे उपसभापती श्री. मानसिंग धुमाळ, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. सुरेश घुले, तसेच श्री. अशोकराव गावडे, दिलीपदादा जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

२) अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या आपदग्रस्तांना आर्थिक मदत :-

अहवाल सालात महाराष्ट्रात दि. २६/०७/२००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे लोकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. संस्थेने 'मुख्यमंत्री सहायता निधी' देणगी देऊन आपदग्रस्तांना मदतीचा आपला खारीचा वाटा उचलला आहे.

आभार :-

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्थाकार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्याचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि. तुर्भे, नवी मुंबई को-ऑप.बँक लि., कॉसमॉस को-ऑप.बँक, नॅशनल को-ऑप.बँक, अभ्युदय को-ऑप.बँक, आय.डी.बी.आय. बँक, राजर्षी शाहु सहकारी बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरिक्षक श्री. एम.एल.मोहोळीकर, अंतर्गत लेखापरिक्षक श्री. आर.आर. पिंगळे, संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्याची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करु शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मनःपुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

श्रद्धांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झाले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

आपला सहकारी

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

कैलास वि. खोपडे

अध्यक्ष

वैधानिक लेखापरीक्षकांचा तपासणी अहवाल

(३१ मार्च २००६ रोजी संपलेल्या वर्षासाठी)

महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५) ब आणि महाराष्ट्र सह. संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा

आम्ही पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई (यापुढे याचा उल्लेख पतसंस्था म्हणून) या संस्थेचा ३१ मार्च २००६ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक ज्यात पाच शाखांचा हिशोबही अंर्तभुत आहे. याची तपासणी केलेली आहे. या सर्व आर्थिक व्यवहाराच्या हिशोबाची स्टेटमेंटसची जबाबदारी व्यवस्थापकांची / पदाधिकाऱ्यांची असून आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या तपासणी प्रमाणे त्यावर आमचे मत / सूचना व्यक्त करणे एवढी आहे.

आमचे हिशोबतपासणी व लेखापरीक्षण हे भारतातील हिशोब तपासणीच्या सामान्यपणे स्वीकारलेल्या पद्धतीवर केलेले आहे. त्यानुसार आम्ही आमचे तपासणी काम चुकीच्या माहितीवर व रेकॉर्डस्वर केलेले नाही. त्याची खात्री संस्थेकडून अपेक्षा ठेवून केलेली असते. तपासणी मध्ये नमुना तपासणी (टेस्ट केलेला) केल्या जातात व त्या हिशोबात जुळतात की नाही आणि (अकौंटिंग प्रिन्सिपल) अंदाजपत्रक व आर्थिक व्यवहाराची नोंद नियमानूसार आहे की नाही हे पाहिले जाते. आमच्या हिशोब तपासणीवरून व्यक्त केलेली आमची मते ही योग्य त्या आधारावर केलेली आहेत असे आम्हांस वाटते. आमच्या निरीक्षणावरून वरील मतांव्यतिरीक्त आम्ही आमचा अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

१) आमच्या लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालीलप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

२) आमच्या मते आम्हांला मिळालेल्या माहिती व खुलासेच्या आधारे

अ) ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकांशी जुळते असुन सदर ३१.०३.२००६ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराशी कामकाजाची सत्य व वास्तव्य स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफा-तोट्याची सत्य व वास्तव्य स्थिती दर्शवितो.

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिपणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यानूसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव्य स्थिती दर्शवितात.

३) आमच्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम या नुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

४) संस्थेस लेखापरीक्षण कालावधीकरीता **"अ"** वर्ग देण्यात येत आहे.

५) वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखा परिक्षण प्रतिवृतांवरील विभाग 'अ', 'ब', 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

एम. एल. मोहोळकर ॲण्ड कं.
सनदी लेखापाल
वैधानिक लेखापरिक्षक

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : २६-०६-२००६

दि. ३१ मार्च २००६

सन २००४-०५ रु. पैसे	भांडवल व देणी		सन २००५-०६ रु. पैसे
५,००,००,०००.००	**अधिकृत भाग भांडवल :**		५,००,००,०००.००
७८,४६,०००.००	**वसूल भाग भांडवल :**		८३,३८,५००.००
	राखीव निधी व इतर निधी :		
१८,४७,९५७.००	राखीव निधी	२२,१३,१४७.००	
३१,११,२८६.००	इमारत निधी	३८,३०,८६६.००	
५,६५,०००.००	संशयित बुडीत कर्ज निधी	८,१३,०००.००	
१,४५,०००.००	लाभांश समानिकरण निधी	१,५५,०००.००	
४४,१३६.००	सभासद कल्याण निधी	३५,१५२.००	
५३,९९९.००	धर्मादाय निधी	५३,९९९.००	
४३,०००.००	सेवक कल्याण निधी	४३,०००.००	
-----	सहकार प्रशिक्षण निधी	२१,३६१.००	
४४,०००.००	सेवक ग्रॅज्युईटी निधी	५४,०००.००	
११,०००.००	दशकपुर्ती सोहळा निधी	२१,०००.००	७२,४०,५२५.००
	सभासद ठेवी :		
९३,०८,३३३.००	बचत ठेव	१,०५,७२,२०७.००	
१,३७,७३,९४६.००	दैनंदिन बचत ठेव	२,०९,६८,३०८.००	
४५,२१,४७१.००	सभासद ठेव	४१,९०,१०८.००	
७०,१६,२९१.००	अल्प मुदत ठेव	९१,९१,४०८.००	
९७,८१,३१९.००	मुदत ठेव	१,३२,१२,६६०.००	
१,७३,६१,४२३.००	दामदुप्पट ठेव	१,८२,८१,४२९.००	
६,६३,७७४.००	पारिजात बक्षीस ठेव-१९९८	१,५०,६७६.००	
३८,७८,५७४.००	पारिजात बक्षीस ठेव-२०००	३६,७७,३६४.००	
२९,१४,९१८.००	सिद्धी ठेव-२००१	२९,६०,०६१.००	
४०,३२,४००.००	संकल्प सिद्धी ठेव-२००३	३१,५७,९९६.००	
५९,५४,६७५.००	मासिक प्राप्ती ठेव	९९,०२,७२५.००	
१९,८४,७६२.००	आवर्त ठेव	१८,८५,२३४.००	
६३,७५,७४२.००	शुभकार्य ठेव	१,२०,८८,१९३.००	११,०२,३८,३६९.००
	इतर देणी व तरतूदी :		
६,६६,०३५.००	ठेवीवरील देय व्याज	७,४१,३८८.००	
५,३७,८५३.००	लाभांश देणे	७,०१,६६६.००	
----	रिटेंशन मनी	२०,९१६.००	
११,६९६.००	अधिभार (सरचार्ज) देणे	१६,५८२.००	
----	शेअर्स अनामत खाते	३,५००.००	१४,८४,०५२.००
१०,२४,९४,५९०.००	पुढील पानवर.....		१२,७३,०१,४४६.००

रोजीचे ताळेबंदपत्रक

सन २००४-०५ रु. पैसे	मालमत्ता व देणी		सन २००५-०६ रु. पैसे
	रोख व बँक शिल्लक :		
२,९९,८४१.००	रोख शिल्लक	२,६६,७००.००	
१,२५,३६९.००	कॉसमॉस को-ऑप. बँक लि.	७,७१,७२५.००	
----	महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.	२,५२,२६०.००	
१,७९,००७.००	दि. ठाणे जि.म.सह.बँक	१८,६९७.००	
१,१०,६९४.७४	नवी मुंबई को-ऑप.बँक	९,९५,२३२.७४	
४२,६४६.००	आय.डी.बी.आय.बँक लि.	५९,०८७.००	
८६,६२८.००	नॅशनल को-ऑप.बँक	३,५४,४७६.५०	
१,५४,९३०.००	अभ्युदय को.ऑप.बँक	१,८७,३१४.००	
२,८९,७५६.००	राजश्री शाहू सह. बँक लि.-पुणे	८,७३९.००	
३,२१६.००	परिवर्तन को-ऑप. बँक लि.	३,३७५.००	
----	अजित सहकारी बँक लि.	४,०६,०१९.००	३३,२३,६२५.२४
	गुंतवणूक :		
१,०००.००	ठाणे जि.मध्य.सह.बँक-भाग	१,०००.००	
३,०००.००	महा.रा.सह.पत.फेडरेशन-भाग	३,०००.००	
१६,३०,८५०.००	ठाणे जि.म.सह.बँक-राखीव निधी	१९,३०,८५०.००	
---	महाराष्ट्र राज्य सह. बँक-राखीव निधी	३,००,०००.००	
१,४५,०००.००	ठाणे जि.म.बँक-लाभांश.समा.निधी	१,४५,०००.००	
---	महाराष्ट्र राज्य सह. बँक-लाभांश.समा.निधी	१०,०००.००	
१०,१०,०००.००	ठाणे जि.म.बँक-संश.व बु.कर्ज व थकित व्याज निधी	१०,१०,०००.००	
---	महाराष्ट्र राज्य सह.बँक-संश.व बु.कर्ज निधी	२,५०,०००.००	
५९,०००.००	ठाणे जि.म.बँक-धर्मादाय निधी	५९,०००.००	
२१,०००.००	ठाणे जि.म.बँक-सभा, कल्याण निधी	२१,०००.००	
---	महाराष्ट्र राज्य सह.बँक-सभा कल्याण निधी	१५,०००.००	
७४,०००.००	ठाणे जि.म.सह.बँक-कर्म. ग्रॅ. व कल्याण निधी	७४,०००.००	
----	महाराष्ट्र राज्य सह.बँक-कर्म.ग्रॅ.व कल्याण निधी	२५,०००.००	
८२,०५,०००.००	ठाणे जि.म.सहकारी बँक-मुदत ठेव	७८,५५,०००.००	
---	महाराष्ट्र सहकारी बँक लि.-मुदत ठेव	२८,००,०००.००	
४५,००,०००.००	कॉसमॉस को-ऑप. बँक-मुदत ठेव	८५,००,०००.००	
---	सारस्वत को-ऑप बँक लि. -मुदत ठेव	१०,००,०००.००	
१८,५०,०००.००	नवी मुंबई को.-ऑप बँक - मुदत ठेव	२०,००,०००.००	
१०,००,०००.००	नॅशनल को-ऑप बँक -मुदत ठेव	११,००,०००.००	
१३,००,०००.००	अभ्युदय को-ऑप बँक-मुदत ठेव	१८,००,०००.००	
---	अजित सहकारी बँक लि.-मुदत ठेव	१४,००,०००.००	
३,००,०००.००	आय.डी.बी.आय. बँक लि.	---	३,०२,९८,८५०.००
२,१३,९०,९३७.७४	पुढील पानवर.....		३,३६,२२,४७५.२४

पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

दि. ३१ मार्च २००६

सन २००४-०५ रु. पैसे	भांडवल व देणी		सन २००५-०६ रु. पैसे
१०,२४,९४,५९०.००	**मागील पानवरुन.....**		१२,७३,०१,४४६.००
२,७०५.००	व्यवसाय कर	३,२४०.००	
२,१२१.००	आय कर टि.डी.एस.	६,०६४.००	
२१,८७४.००	सेवक भविष्य निर्वाह निधी	२५,०६९.००	
८४,०००.००	लेखापरिक्षण फी	१,२०,०००.००	
५,०००.००	शिक्षण निधी	५,०००.००	
४,१३८.००	कर्मचारी विमा हप्ता	४,२२५.००	
---	अतिरिक्त लाभ कर	१०,०००.००	
१०,८००.००	टेलिफोन बिल	९,८५०.००	
३९,२००.००	विज बिल	१९,५००.००	
४,०००.००	कार्यालयीन भाडे	----	२,०२,९४८.००
९,४१,५००.००	**थकीत व्याज निधी तरतूद :**		९,४१,५००.००
	नफा तोटा खाते :		
८६५.५०	मागील वर्षाचा शिल्लक नफा	७५.७४	
१२,९९,४९०.२४	अधिक : चालू वर्षाचा नफा	११,६६,२४४.५०	११,६६,३२०.२४
१०,४९,१०,२८३.७४	**एकुण**		१२,९६,१२,२१४.२४

दिनांक : २६-६-२००६
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

श्री. एम. एल. मोहोळकर
वैधानिक लेखापरिक्षक

श्री. एस. आर. ताकवले
व्यवस्थापक

श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

रोजीचे ताळेबंदपत्रक

सन २००४-०५ रु. पैसे	मालमत्ता व देणी		सन २००५-०६ रु. पैसे
२,१३,९०,९३७.७४	**मागील पानवरुन.....**		३,३६,२२,४७५.२४
	सभासद कर्जे :		
४५,९९,०२२.००	वैयक्तिक /जामिनकी कर्ज	१,५१,६७,९११.००	
२,४५,३८,४८९.००	व्यवसाय कर्ज	१,२३,५३,५५१.००	
२९,७९,४८०.००	वाहन तारण कर्ज	२०,९२,२७८.००	
१,५३,४१,७५१.००	सुरक्षित तारण कर्ज	२,५४,९६,६२८.००	
८७,८४,५८६.००	इतर तारण कर्ज	१,०४,४२,०४१.००	
४,९९,८०८.००	शासकीय रोखे कर्ज	२,६८,६०७.००	
१२,६६,६५२.००	दावा दाखल कर्ज	१७,०२,४४२.००	
२,२७,८८५.००	कर्मचारी वैयक्तिक कर्ज	४,४२,१३२.००	
१,०१,८६६.००	कर्मचारी वाहन तारण कर्ज	२,०८,५३३.००	
२,४६,२०८.००	कर्मचारी घरतारण कर्ज	४,६८,१२३.००	
४,०७,४६३.००	दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज	५,७०,९८९.००	
१,००,६१,५९३.००	ठेव तारण कर्ज	१,०७,१३,९११.००	
१,५०,६१८.००	सोने तारण कर्ज	५,२६,६०९.००	८,०४,५४,७५५.००
	मालमत्ता :		
२०,३६,२९८.००	फर्निचर व फिक्चर्स खाते	२२,७५,४७८.००	
५,२६,४९८.००	संगणक खाते	६,२०,२२५.००	
९२,३१४.००	वातानुकूलीत यंत्रे खाते	१,२८,८५४.००	
२७,३३०.००	इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते	२४,८४८.००	
१३,३४२.००	कार्यालय साधन सामुग्री खाते	५२,४५४.००	
१२,७८,४३७.००	इमारत खाते	१२,१४,५१६.००	
४०,०७५.००	डेली कलेक्शन मशीन	२९,१०३.००	
१,६२७.००	ग्रंथालय खाते	१,९३६.००	४३,४७,४१४.००
	येणे व्याज :		
९,४१,२८३.००	सभासद कर्जावरील येणे व्याज	९,०९,०३५.००	
३२,९८,९०८.००	गुंतवणूकीवरील येणे व्याज	४०,२९,६४४.००	४९,३८,६७९.००
	इतर येणी :		
२,३०,०००.००	कार्यालय अनामत	२,७५,०००.००	
५,०००.००	बि.ई.एस.टी. अनामत	५,०००.००	
१०,३५३.००	एम.टी.एन.एल. अनामत	१३,३५३.००	
२४,२१०.००	एम.एस.ई.बी. अनामत	२४,२१०.००	
१,०८,१६०.००	स्टेशनरी स्टॉक	१,८३,९७३.००	
८,३४०.००	मुद्रांक साठा	५,६३०.००	
१८,६१०.००	आगाउ विमा	२०,६९९.००	
--	टि.डी.एस. येणे खाते	१,३२१.००	
७१,२४०.००	प्राथमीक खर्च (धनकवडी शाखा)	४७,४९६.००	
----	प्राथमीक खर्च (हडपसर शाखा)	६३,१०९.००	६,३९,७९१.००
	ॲडव्हान्स :		
१,३०,९००.००	दै. ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स	५८,१००.००	
५१,५१,०००.००	मुख्य कार्यालय इमारत	५५,५१,०००.००	५६,०९,१००.००
१०,४९,१०,२८३.७४	**एकुण**		१२,९६,१२,२१४.२४

श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष

दि. ३१ मार्च २००६

सन २००४-०५ रु. पैसे	खर्च	सन २००५-०६ रु. पैसे
६७,६८,४२५.००	सभासद ठेवीवरील व्याज	७२,७५,२१४.००
११,१५,६९९.००	कर्मचारी पगार, बोनस व भत्ता	१४,६४,९१८.००
१,१२,२९४.००	कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व व्याज	१,३१,४४८.००
६,०००.००	कर्मचारी सेवा निवृत्त निधी	१०,०००.००
१५,०७,०७८.००	दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन	१८,६४,८५१.००
२,५१,७००.००	कार्यालय भाडे	२,९९,५००.००
९१,२६३.००	छपाई व स्टेशनरी खर्च	१,५२,३६२.००
४४,९५०.००	वार्षिक अहवाल खर्च	२८,१७४.००
१,८८,८५०.००	किरकोळ खर्च	१,१८,४२२.५०
१,२७,६५६.००	विज खर्च	१,४९,९७५.००
१,१०,७७३.००	टेलिफोन खर्च	१,०७,५८६.००
७४,९९४.००	प्रवास खर्च	६५,६५०.००
२०,४७९.००	विमा खर्च	२९,६४६.००
१३,८१७.००	तार व टपाल खर्च	१७,२६५.००
४३,८५४.००	कार्यालय दुरूस्ती व देखभाल खर्च	४०,४७२.००
४,४५०.००	कार्यालय पाणी बिल खर्च	३,४१८.००
२८,८५८.००	संगणक दुरूस्ती व देखभाल खर्च	८१,५०५.००
६,०००.००	कार्यालय साफसफाई (AMC)	१२,०००.००
----	वातानुकूलीत यंत्रे (AMC)	२,६००.००
----	डेली मशिन (AMC)	१,३५०.००
३,३१५.००	कार्यालय देखभाल शुल्क	३,६२०.००
----	कार्यालय साफसफाई खर्च	३८,७६९.००
८४,६३७.००	लेखापरिक्षण फी (शासकीय/अंतर्गत)	१,३३,४७२.००
७,५००.००	कायदे सल्लागार फी	१२,०२२.००
२,५००.००	व्यवसाय कर खर्च संस्था	२,५००.००
१,१६०.००	सभासदत्व व वर्गणी	१,५००.००
६००.००	सहकार प्रशिक्षण खर्च	----
२,५५१.००	अपादग्रस्त मदत निधी	२,५५१.००
२,८४,०३९.००	बक्षीस खर्च	----
२९,३३९.००	पुजा खर्च	१३,४८५.००
७,३६४.००	कार्यालय मालमत्ता कर	७,३६४.००
६,०८८.७६	बँक चार्जेस	१३,०३३.००
----	सर्व्हीस टॅक्स	१४,०५२.००
----	कर व परवाना फी	२,२५०.००
----	अतिरिक्त लाभ कर	३७,०००.००
१६,१४७.००	वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	२०,०४३.००
५,०००.००	शिक्षण निधी तरतूद	५,०००.००
३५,६००.००	प्राथमिक खर्च निर्लेखित	३९,५२१.००
१२,६००.००	संचालक सभा भत्ता खर्च	४७,४००.००
----	शिपाई गणवेश खर्च	३,०८८.००
----	फेस्टिवल सेलिब्रेशन खर्च	७,९५१.००
----	भेट व तपासणी खर्च	४,८७४.००
१,१९,२३७.००	अधिकर्ष व्याज खर्च	१७,७५३.००
३,१६,५००.००	थकित व्याज निधी तरतूद	----
१,५५,०००.००	बुडीत कर्ज निधी तरतूद	----
५,७२,७०१.००	घसारा	५,४८,७८२.००
१२,९९,४९०.२४	निव्वळ नफा ताळेबंद वर्ग	११,६६,२४४.५०
१,३४,७८,५०९.००	एकुण	१,३९,९८,६३१.००

दिनांक : २६-६-२००६
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

श्री. एम. एल. मोहोळकर
वैधानिक लेखापरिक्षक

श्री. एस. आर. ताकवले
व्यवस्थापक

श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

अखेरचे नफा-तोटा पत्रक

सन २००४-०५ रु. पैसे	उत्पन्न	सन २००५-०६ रु. पैसे
१७,६४,४९०.००	गुंतवणूकीवरील व्याज	२१,५३,८७३.००
१,१५,४६,२२६.००	सभासद कर्जावरील व्याज	१,१६,३७,५९०.००
४४,४८५.००	कर्ज वसुली चार्जेस जमा	५३,८६०.००
१,२३,१५८.००	फॉर्म फी, सर्विस चार्जेस इ.	१,५३,१५८.००
१५०.००	लाभांश	१५०.००
१,३४,७८,५०९.००	एकुण	१,३९,९८,६३१.००

श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष

अंदाज पत्रक सन २००६-२००७

उत्पन्न तपशिल	अंदाजे उत्पन्न २००५-०६	प्रत्यक्ष उत्पन्न २००५-०६	अंदाजे उत्पन्न २००६-०७
सभासद कर्जावरील व्याज	१४०.००	११६.९२	१४८.००
गुंतवणुकीवरील व्याज व लाभांश	२५.००	२१.५४	२७.००
इतर उत्पन्न	२.००	१.५३	२.२५
एकूण	१६७.००	१३९.९९	१७७.२५

खर्च तपशिल	अंदाजे खर्च २००५-०६	प्रत्यक्ष खर्च २००५-०६	अंदाजे खर्च २००६-०७
सभासद ठेवीवरील व्याज	८५.००	७२.७५	८७.००
कर्मचारी पगार खर्च	१७.००	१६.०६	१९.००
दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन	१८.००	१८.६५*	२३.२५
छपाई व स्टेशनरी खर्च	३.५०	१.८०	३.५०
वार्षिक सभा व संचालक सभा भत्ता	०.४८	०.६७*	०.८५
प्रवास व किरकोळ खर्च	३.७५	१.९५	३.५०
विमा व पोस्टेज खर्च	०.५०	०.४७	०.८०
विज, फोन, पाणी, कर, भाडे	६.२५	६.२१	९.००
देखभाल व दुरुस्ती, पुजा, उद्घाटन	१.६०	१.४३	२.५०
ऑडिट फी, व्यवसाय शुल्क	१.२५	१.३३*	१.८०
वार्षिक देखभाल कंत्राट, वर्गणी व्यवसाय कर	१.२५	१.१५	२.००
ओ.डी.व्याज, बँक चार्जेस	१.५०	०.३१	०.७०
घसारा	६.००	५.४९	८.५०
तरतुदी	४.००	०.०५	१.७५
नफा	१६.९२	११.६६	१३.१०
एकूण	१६७.००	१३९.९९	१७७.२५

* अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मासिक सभेत मंजुरी दिली असुन वार्षिक सभेत सदर खर्चास मंजुरीसाठी शिफारस करत आहे.

पोटनियम दुरुस्ती

पो.नि.क्र.	अस्तित्वातील शब्दरचना	दुरूस्तीनंतर शब्दरचना	दुरुस्तीचे कारण
कर्जविषयक नियम क्र. १०	**कर्जाची मुदत -** संस्थेच्या बिगरतारणी (जामिनकी) कर्जाची व तारणी कर्जाची परतफेडीची मुदत अल्प-मध्यम मुदत राहील. (अल्पमुदत म्हणजे १ वर्षापर्यंत व मध्यम मुदत म्हणजे ७ वर्षापर्यंत राहील.)	**कर्जाची मुदत -** संस्थेच्या बिगरतारणी (जामिनकी) कर्जाची व तारणी कर्जाची परतफेडीची मुदत अल्प-मध्यम व दीर्घ मुदत राहील. कर्जफेडीसाठी अल्पमुदत १ वर्षापर्यंत मध्यम मुदत ७ वर्षे पर्यंत व दीर्घ मुदत १० वर्षे पर्यंत राहील.	मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे दि. ०५/०३/०४ चे परिपत्रकानुसार.
	परिशिष्ट क - २ **कर्जाचा प्रकार** **कमाल मर्यादा** **२. तारणी कर्ज**	**परिशिष्ट क - २** **कर्जाचा प्रकार** **कमाल मर्यादा** **२. तारणी कर्ज**	प्रचलित कर्जसुविधा सभासदांना अधिक चांगल्या प्रकारे देण्यासाठी
	अ) नविन वाहनतारण कर्ज- वाहन किमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त कर्जमर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु.२५ लाखपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	**अ) नविन वाहनतारण कर्ज-** वाहन किमतीच्या ८५% किंवा जास्तीत जास्त कर्जमर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु.२५ लाखपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	
	ब) ५ वर्षाच्या आतील जुन्या वाहनासाठी कर्ज- वाहन किमतीच्या ५०% किंवा जास्तीत जास्त कर्जमर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु.१५ लाखपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	**ब) ५ वर्षाच्या आतील जुन्या वाहनासाठी कर्ज-** तीन वर्षाच्या आतील जुने वाहनासाठी मुल्यांकनाच्या ६०% पर्यंत व तीन ते पाच वर्षापर्यंत वाहन मुल्यांकनाच्या ५०% पर्यंत किंवा जास्तीत जास्त कर्जमर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु.१५ लाखपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	प्रचलित कर्जसुविधा सभासदांना अधिक चांगल्या प्रकारे देण्यासाठी
	क) स्थावर तारण कर्ज- स्थावर तारण कर्ज रक्कमेच्या दुप्पट किंमतीचे असले पाहिजे. जास्तीत जास्त मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये आणि जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. २५ लाखपर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	**क) स्थावर तारण कर्ज-** १) घर, दुकान, ऑफीस बांधणी कर्ज. २) व्यवसाय उद्योगधंदे कर्ज. ३) कॅश क्रेडीट / ओव्हरड्राफ्ट कर्ज. ४) स्वंयःरोजगार/प्रोफेशनल कर्ज. स्थावर मालमत्ता तारणावर किंमतीच्या ७५% पर्यंत जास्तीत जास्त मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये आणि जास्तीत तास्त कमाल मर्यादा रु.२५ लाखा पर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती.	प्रचलित कर्जसुविधा सभासदांना अधिक चांगल्या प्रकारे देण्यासाठी
	ड) मशिनरी तारण कर्ज- स्थावर तारण कर्ज रक्कमेच्या दुप्पट किंमतीचे असले पाहिजे. कर्ज अणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये आणि जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. २५ लाखपर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	**ड) मशिनरी तारण कर्ज-** नवीन मशीनरी किंमतीच्या ७५% पर्यंत व जुन्या मशिनरी साठी मुल्यांकनाच्या ५०% पर्यंत आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये आणि जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. २५ लाखपर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	प्रचलित कर्जसुविधा सभासदांना अधिक चांगल्या प्रकारे देण्यासाठी
	उ) ठेव तारण कर्ज- मुदत ठेवी तारण घेऊन मुदत ठेवीच्या ८०% पर्यंत आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये आणि जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. २५ लाखपर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	**उ) ठेव तारण कर्ज-** मुदत ठेवी तारण घेऊन मुदत ठेवीच्या ८५% पर्यंत आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये आणि जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. २५ लाखपर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	प्रचलित कर्जसुविधा सभासदांना अधिक चांगल्या प्रकारे देण्यासाठी
	ऊ) सोने चांदी कर्ज- सोने चांदी, दागदागिने किंमतीच्या ५०% आणि दागदागिने तारण कर्ज जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. १० लाखपर्यंत राहील यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	**ऊ) सोने चांदी कर्ज-** सोने चांदी, दागदागिने किंमतीच्या ८०% आणि इागदागिने तारण कर्ज जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. १० लाखपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	प्रचलित कर्जसुविधा सभासदांना अधिक चांगल्या प्रकारे देण्यासाठी
	------	**ऐ) शासकीय रोखे तारण कर्ज-** **एल.आय.सी. / एन.एस.सी. / इंदिरा / किसान विकास पत्र** विमा पॉलीसी सरेंडर व्हॅल्यूच्या ७०% पर्यंत तसेच एन.एस्.सी. / इंदिरा / किसान विकास पत्राच्या दर्शनी मुल्याच्या ७०% पर्यंत जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असु नये व जास्तीत जास्त कमाल मर्यादा रु. २५ लाखपर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	सभासदांच्या तातडीच्या गरजा भागविण्यास सुरक्षित, तारणी कर्ज वाटपासाठी
अ.१.१. अ.	**संस्थेचे कार्यक्षेत्र -** संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई, रायगड व पुणे जिल्ह्या पुरते मर्यादित राहील	**संस्थेचे कार्यक्षेत्र -** संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई, रायगड, पुणे व सातारा जिल्ह्या पुरते मर्यादित राहील	बरेचसे सभासद व्यवसायानिमित्त लगतच्या जिल्ह्यात स्थायिक झाल्याने.

परिशिष्ट - अ

संस्थेचे नांव	:	**पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि.,** नवी मुंबई - ४०० ७०३.
मुख्य कार्यालय	:	अे/३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
नोंदणी क्रमांक	:	टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस्.आर. (सी.आर.) ९५१-९७
कार्यक्षेत्र	:	बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा
शाखा	:	पाच (मुख्य कार्यालय व्यतिरिक्त पाच शाखा)
सभासद संख्या	:	४१०७
अधिकृत भाग भांडवल	:	रु. ५,००,००,०००.००
वसुल भाग भांडवल	:	रु. ८३,३८,५००.००
राखीव व इतर निधी	:	रु. ७२,४०,५२५.००
ठेवी	:	रु. ११,०२,३८,३६९.००
कर्जे	:	रु. ८,०४,५४,७५५.००
बाहेरील कर्जे	:	नाही
गुंतवणूक	:	रु. ३,०२,९८,८५०.००
लेखापरिक्षण वर्ग	:	'अ'
अहवाल सालातील नफा	:	रु. ११,६६,२४४.५०
कर्मचारी वर्ग	:	२९
खेळते भांडवल	:	रु. १२,९६,१२,२१४.२४

संचालक कर्जाचा तपशील :-

३१-०३-२००६ अखेर येणे कर्ज	३१-०३-२००६ अखेर थकबाकी	थकबाकीचे प्रमाण
५,१३,३७०.००	००.००	००%

संचालक नातेवाईक कर्जाचा तपशील :-

३१-०३-२००६ अखेर येणे कर्ज	३१-०३-२००६ अखेर थकबाकी	थकबाकीचे प्रमाण
१२,६०,३७२.००	००.००	००%

सभासदांना सूचना :-

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी अपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. या बाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

वाशी
अे-३/७, सेक्टर -१५,
मराठा भवन मार्ग,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
फोन : २७८०२६५९

नेरुळ
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स,
शॉप नं. २८, प्लॉट नं. १७,
सेक्टर-८, नेरुळ, नवी मुंबई - ७०६.
फोन : ३२५९६९८५

धनकवडी
सरस्वती मंगल कार्यालय,
पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१,
पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे.
फोन : ०२०-३२९०६७४६

दादर
१०९,'बी' विंग, गुरूकृपा हौ. सोसायटी,
न.चि. केळकर रोड,
प्लाझा सिनेमा समोर, दादर, मुंबई-२८.
फोन : ३२५१९०९०

हडपसर
अमर समृद्धी कॉम्प्लेक्स,
आकाशवाणी केंद्रा जवळ, सोलापूर रोड,
हडपसर, पुणे-२८
फोप : ०२० - ३२५१७६७१

विविध ठेव योजना :-

'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत..... कुटुंबातील सर्वांसाठी

मासिक प्राप्ती योजना

खास पेन्शनर व VRS घेतलेल्यांसाठी

रु, १,१४,३५०/- गुंतवा व दरमहा

रु. १०००/- पेन्शन रुपी व्याज मिळवा

शुभकार्य ठेव योजना

दरमहा	भरा	मिळवा
रु. ६००/-	फक्त ६६ महिने	रु. ५०,०००/-
रु. १२००/-		रु. १,००,०००/-

व्याजदर (दि. १/१२/२००४ पासून)

४६ ते १८० दिवस	६%
१८१ ते ३६४ दिवस	७%
१ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी	८%*
२ वर्षे ते ३ वर्षापेक्षा कमी	९%*
३ वर्षे ते ५ वर्षापर्यंत	१०%*

* ज्येष्ठ सभासदांना अर्धा टक्का अधिक व्याज

लखपती मुदत ठेव योजना

रु. ६२,१००/- ५ वर्षात	रु. १ लाख
रु. ५८,२५०/- ६८ महिन्यात	रु. १ लाख

दामदुप्पट ठेव योजना

डबल धमाका

आपली रक्कम ८४ महिन्यात दामदुप्पट

पारिजात चा सुगंध सदैव मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते

विविध कर्ज योजना :-

स्वप्न तुमचे .... सहाय्य आमचे

• गृहपयोगी उपकरणे • फर्निचर • संगणक • शिक्षण • वाहन • मशिनरी • घरदुरुस्ती • लग्नकार्य • वैद्यकीय • धार्मिक कार्य • व्यवसाय वृद्धी

विविध कर्ज योजना

वैयक्तीक कर्ज	वाहन तारण कर्ज	तारण कर्ज	तत्काळ कर्ज
रु. ७५,०००/- पर्यंत व्याज दर १५%	रु. ७.५० लाख पर्यंत व्याजदर १४%	रु. ७.५० लाख पर्यंत व्याजदर १४%	ठेव तारण LIC/NSC तारण

क्षणचित्रे



विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे कु. प्रियांका मराठे (एस.एस.सी. बोर्डात मुलींमध्ये सर्वप्रथम) व श्री. सुभाष आहिरे (संचालक, डॉटलिंक कॉम्प्युटर) यांचा सत्कार करण्यात आला.



धनकवडी (पुणे) शाखा द्वितीय वर्धापन दिनानिमित्त 'सुयोग हॉस्पिटल' मध्ये रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.



दैनंदिन ठेव संकलना मध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल सौ. मंगल तानाजी भोसले यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य सह. संघ व ठाणे जिल्हा सह. बोर्ड यांच्या विद्यमाने संस्थेने आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबीरात उद्घाटनपर भाषण करताना मा. श्री. भाऊसाहेब कुऱ्हाडे (संचालक, ठाणे जि.म.सह.बँक)




संस्थेच्या ५ व्या हडपसर (पुणे) शाखेचे उद्घाटन करताना मा.आ.श्री. जगन्नाथ शेवाळे तसेच उपस्थित मा.श्री. अशोक गावडेशेठ, मा. श्री. यशवंत घुले व संस्थेचे पदाधिकारी



हडपसर (पुणे) शाखा उद्घाटन सोहळ्या प्रसंगी विविध मान्यवरांनी संस्थेच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा



सन	२००१-२००२	२००२-२००३	२००३-२००४	२००४-२००५	२००५-२००६
भाग भांडवल	५७,४०,५५०.००	७३,९६,५५०.००	७७,०३,८००.००	७८,४६,०००.००	८३,३८,५००.००
गुंतवणूक	८०,९४,०००.००	१,२५,४७,१३०.००	१,९२,१३,९४८.००	२,००,९८,८५०.००	३,०२,९८,८५०.००
ठेवी	३,८०,२८,४३९.००	४,६८,५६,२४८.००	७,२४,१८,७८४.००	८,७५,६७,६२८.००	११,०२,३८,३६९.००
कर्जे	३,८०,५६,०१२.००	४,४२,७३,५७३.००	५,६४,१७,५११.००	६,९५,०५,४२१.००	८,०४,५४,७५५.००
खेळते भांडवल	५,१३,७६,७६४.००	६,५१,३८,२९५.००	८,७७,१७,८५३.००	१०,४९,१०,२८३.००	१२,९६,१२,२१४.००

आमच्या शाखा

- वाशी
- हडपसर
- नेरूळ
- दादर
- धनकवडी

प्रेषक :

पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

अे/३/७, सेक्टर - १५, मराठा भवन मार्ग, वाशी,
नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८० २६५९

बुक - पोस्ट

प्रति,

जननी प्रिंटिंग प्रेस, विक्रोळी, मुंबई. फोन : २५७७९९७२